# 'क्विकहिल'कडून जनकल्याण समितीच्या पटवर्धन रुग्णालयाला रुग्णवाहिकेची भेट

**पनवेल** : 'क्विकहिल' कंपनीच्यावतीने रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित पटवर्धन रुग्णालयाला रुग्णवाहिका नुकतीच भेट म्हणून देण्यात आली. पटवर्धन रुग्णालयामध्ये एका विशेष समारंभामध्ये हा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. सदर कार्यक्रमास 'क्विकहिल' कंपनीचे अध्यक्ष व 'मॅनेजिंग डायरेक्टर' कैलास काटकर, विश्वस्त 'क्विकहिल फाऊंडेशन' अनुपम काटकर, 'सीएसआर' प्रमुख अजय शिर्के, रा. स्व. संघ जनकल्याण समिती प्रांताध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, प्रांत कार्यवाह तुकाराम नाईक, प्रांत



सह कार्यवाह विनायकराव डंबीर, प्रांत कोषाध्यक्ष प्रदीप पराडकर, रा. स्व. संघ प. महाराष्ट्र सह कार्यवाह धनंजय घाटे, रा. स्व. संघ कोकण प्रांत सह सेवाप्रमुख शिरीष देशमुख, रा. स्व. संघ जनकल्याण समिती कोकण प्रांत कार्यवाह अविनाश धाट, उप आयुक्त पनवेल महानगरपालिका विठ्ठल डाके, साहाय्यक आयुक्त पनवेल महानगरपालिका धैर्यशील जाधव, पटवर्धन रुग्णालय प्रकल्प समिती अध्यक्ष डॉ. रवींद्र ईनामदार, उपाध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र, कार्यवाह राजीव समेळ, कोषाध्यक्षा अनुराधा ओगले, रुग्णालय संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता पूजन व रुग्णवाहिका उद्घाटनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुराधा ओगले यांनी केले. 'क्विकहिल'चे अजय शिर्के, पनवेल महानगरपालिका उपायुक्त विठ्ठल डाके व जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांताध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचा परिचय रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी प्रसन्न खेडकर यांनी करून दिला. सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.